# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ३९/२०२१** **दिनांक १३/०५/२०२१** **कालावधी ५ दिवस**

| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/०५/२०२१ ते १३/०५/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/०५/२०२१ सकाळी ८:३० पासून १८/०५/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **०७/०५** | **०८/०५** | **०९/०४** | **१०/०५** | **११/०५** | **१२/०५** | **१३/०५** | | **१४/०५** | **१५/०५** | **१६/०५** | **१७/०५** | **१८/०५** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ३ | ४ | ४ | १०० | ७३ |
| ३३.५ | ३४.५ | ३४.४ | ३४.० | ३४.१ | ३४.४ | ३४.२ | **कमाल तापमान (अं.से)** | ३५ | ३८ | ३८ | ३६ | ३५ |
| २१.९ | २३.० | २२.९ | २२.१ | २१.६ | २१.७ | २२.३ | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २७ | २९ | २६ | २७ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८० | ८२ | ८० | ८५ | ८३ | ८१ | ७७ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७५ | ७३ | ६१ | ७८ | ८७ |
| ५६ | ५५ | ६६ | ६३ | ५८ | ५९ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४५ | ३५ | ३३ | ४८ | ७५ |
| ४.४ | ४.५ | ४.७ | ४.७ | ५.१ | ६.२ | ४.९ | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ६ | १० | १२ | ४२ | २५ |
| प. | प. | प. | प. | वा.प. | - | - | **वाऱ्याची दिशा** | प. | नै.द. | ई. | आ.पू. | द. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **१६.८** | **४१४५.४** |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रत्नागिरी जिल्हयात दिनांक १४ ते १५ मे, २०२१ दरम्यान जिल्हयातील तुरळक ठिकाणी हलक्या पाऊसाची आणि दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊसाची शक्यता असून दिनांक १६ ते १८ मे, २०२१ दरम्यान १२ ते ४२ कि.मी. प्रती तास इतक्या वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे तसेच पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहील.** |
| **इशारा** | **अरबी समुद्रात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे रुपांतर दिनांक १६ मे २०२१ रोजी चक्रीवादळात होणार असून या वादळाच्या प्रभावामुळे दिनांक १४ ते १५ मे, २०२१ दरम्यान रत्नागिरी जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट, मेघगर्जना आणि वाऱ्याच्या वेगासह पाऊस तसेच दिनांक १६ मे २०२१ रोजी काही भागामध्ये जोरदार ते अतिजोरदार पाऊस आणि दिनांक १७ मे २०२१ रोजी काही भागामध्ये जोरदार पाऊसाची आणि तुरळक ठिकाणी अति जोरदार पाऊसाचा इशारा देण्यात आला आहे.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोंकण विभागात दिनांक १९ ते २५ मे, २०२१ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | -- | • **दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता सर्व कीटकनाशके फवारणी आणि खतांची मात्रा देणे पुढे ढकलावी. तसेच पक्व पिकांची आणि तयार फळांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. नवीन लागवड केलेल्या फळझाडांना, केळी पिकांना तसेच भाजीपाला, फूल पिकांना काठीचा आधार दयावा.** |

| | | |
|---|---|---|
| **विशेष सल्ला** | -- | • **दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता घराभोवतीचे क्षेत्र तपासावे आणि घराला धोका संभवत असलेली झाडे किंवा फांद्या कडून टाकाव्यात तसेच पिण्याच्या पाण्याचा अतिरिक्त साठा करून ठेवावा. जनावरांच्या गोठ्याची डागडुगी करून घ्यावी. वाऱ्याच्या वेगाचा अंदाज घेवून जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवावे.** |
| **आंबा** | फळधारणा | • दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **तयार आंबा फळांची त्वरीत काढणी करावी** आणि फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. तसेच झाडांच्या वाळलेल्या रोगट फांद्या काढून टाकाव्यात.<br>• **वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा रोपांना काठीचा आधार देण्यात यावा.** |
| **काजू** | वाढीची अवस्था | • **वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू रोपांना काठीचा आधार देण्यात यावा.**<br>• वाळलेल्या काजू बियांची कोरड्या सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **चिकू** | फुलोरा ते फळधारणा | • **वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या चिकू रोपांना काठीचा आधार देण्यात यावा.**<br>• दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **तयार चिकू फळांची त्वरित काढणी करावी** आणि फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>• चिकू बागेमध्ये पावसाळ्यापूर्वी घेण्यात येणारी बुरशीनाशकाची फवारणी पुढे ढकलावी.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता चिकू बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **केळी** | फुलोरा ते फळधारणा | • **वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने केळीच्या झाडांना आधार देण्यात यावा.**<br>• दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **तयार पक्व घडांची त्वरित काढणी करावी** आणि सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता केळी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नारळ** | फळधारणा | • **वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या रोपांना काठीचा आधार देण्यात यावा.**<br>• नारळ बागेमध्ये पावसाळ्यापूर्वी घेण्यात येणारी **बुरशीनाशकाची फवारणी पुढे ढकलावी.**<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ बागेतील **अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.** |
| **सुपारी** | फळधारणा | • **वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या रोपांना काठीचा आधार देण्यात यावा.**<br>• सुपारी बागेमध्ये पावसाळ्यापूर्वी घेण्यात येणारी **बुरशीनाशकाची फवारणी पुढे ढकलावी.**<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता सुपारी बागेतील **अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.** |
| **उन्हाळी भात** | पक्वता | • दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **उन्हाळी भाताची ८० टक्के परिपक्वतेला कापणी करुन लगेच मळणी करून सुरक्षित ठिकाणी धान्य वाळविण्यासाठी ठेवावे.** लगेच मळणी करणे शक्य नसल्यास कापणी केलेले भात सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे. |
| **खरीप भात** | पूर्व मशागत | • खार जमिनीत भाताच्या लागवडीसाठी प्रथम शेतातील ढेकळांची पहारीने उलकटणी करावी व खाचरा सभोवती ३० सें.मी. खोल आणि ४५ सें.मी. रुंदीचे चर तयार करावेत. |

| | | |
|---|---|---|
| | | जेणे करून पाऊसाचे पाणी चरात साठल्याने क्षारांचा निचरा होण्यास मदत होईल. |
| **भुईमुग** | पक्वता | • दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **तयार भुईमुगाचे डहाळे उपटून घेऊन शेंगा तोडून काढाव्यात आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी ठेवाव्यात.** |
| **कडधान्य पिके** | पक्वता | • दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **तयार कडधान्य पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी ठेवावेत.** |
| **हळद** | लागवड | • दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात **घेता हळद लागवडीची कामे पुढे ढकलावी.** मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **हळद लागवड केलेल्या क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.** |
| **भाजीपाला** | रोपवाटिका | • दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **भाजीपाला पिकांच्या पेरणीची कामे पुढे ढकलावी.** मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता **पेरणी केलेल्या भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.** |
| **पशुधन** | -- | • दिनांक १४ ते १८ मे २०२१ दरम्यान जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह, वाऱ्याच्या वेगासह पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने **गाई, म्हैशी इ. जनावरे झाडाखाली न बांधता सुरक्षित ठिकाणी बांधावेत**.<br>• दिनांक १६ ते १८ मे २०२१ दरम्यान चक्रीवादळाची शक्यता असल्याने सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता जनावरांना बाहेर चरावयास सोडू नये.<br>• **जनावरांचे खाद्य जसे भाताचा पेंडा, काड इत्यादी सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावी.** |
| **कुकुटपालन** | -- | • दिनांक १४ ते १८ मे २०२१ दरम्यान जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह, वाऱ्याच्या वेगासह पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने **कुकुटपालन शेडच्या सभोवताल बारदान किंवा गोणपाट बांधावे.** |
| **मच्छीमार** | | • अरबी समुद्रात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे रुपांतर चक्रीवादळात होण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून अरबी समुद्र खवळलेल्या स्थितीत असल्याने **मच्छीमार बांधवानी दिनांक १८ मे २०२१ पर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जावू नये.** |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.